## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| गौराई तुझं जाणं ग, आता कधी येणं ग ! | ३ |
| " मरिआनाड " अस्मितेच्या मानकरी | ६ |
| स्त्रिया आणि आर्थिक विकास | ९ |
| फॅशन्स | १४ |
| खेळणे (कथा) | १८ |
| लाल धरती (कथा) | २१ |
| छोट्या ओमानचा मुक्ती-लढा आणि स्त्रिया | २५ |
| द्विभार्या प्रतिबंधक कायदा | २७ |
| झुंज (कादंबरी) | ३० |
| गुलेरी (कथा) | ३३ |
| नंदूरबारमधील आदिवासी स्त्रीवरील अत्याचाराविरुद्ध स्त्रियांचा मुकाबला | ३६ |


---

* अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

---


संपादक
सौदामिनी राव

साहाय्यक
लीला भोसले, लता भिसे

पत्रव्यवहाराचा पत्ता :
सौदामिनी राव, ९७ प्रभात रस्ता, पुणे ४.


---

# संपादकीय

'पुढल्या वर्षी लवकर या.' गणरायांना निरोप देतानाच पुढच्या वर्षीचे निमंत्रणही आवर्जून दिले जाते गणरायांच्या नावावर दहा दिवस एकत्रित, मजेत घालविता यावेत म्हणून आम्हाला त्याची गरज. सध्या ज्या पध्दतीने गणेशोत्वस साजरा केला जातो त्यावर बऱ्याच वेळा टिका केली जाते. [illegible] आणि इतर राष्ट्रीय संपत्तीची उधळपट्टी, लोकांचा वेळ, पैसा आणि शक्ती यांचा अपव्यय, मोठ्या आवाजात ऐकवली जाणारी सिनेमातील गाणी, फक्त चित्रपटांच्या स्वरूपात शिल्लक असलेली करमणूक, शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीसांवर पडणारा ताण वगैरे गोष्टीची चर्चा होते. परंतु त्याचा परिणाम गणेशोत्सव साजरा करण्याच्या पद्धतीवर काडीमात्र होत नाही. उत्सव, त्यात भाग घेणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे.

लोकमान्य टिळकांच्या काळात, एवढेच नव्हे तर स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या सुरवातीच्या काळातसुद्धा जो गणेशोत्सव सामाजिकदृष्ट्या उपयुक्त पद्धतीने साजरा केला जात होता त्याला गेल्या काही वर्षात अनिष्ट, विकृत वळण का लागावे याचा गांभीर्याने विचार व्हायला पाहिजे. जेव्हा लोकमान्यांनी सार्वजनिक गणेशोत्सव सूरू केला तेव्हा आपला देश पारतंत्र्यात होता. इंग्रजांच्या जुलमी राजवटीला कंटाळलेला प्रत्येक भारतीय देशभक्तीने प्रेरित झालेला होता. देशाला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, मग सर्व काही ठीक होईल ही आशा वाटत होती. या आशेच्या धुंदीतच 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' हे ब्रीदवाक्य लोकांच्या अंतःकरणाला भिडले. प्रत्येक गोष्टच देशप्रेमाने भारली गेली. सहाजिकच गणेशोत्सवही देशभक्तीने भारलेला असे. पण आज परिस्थिती बदलली आहे. स्वातंत्र्य मिळून ३१ वर्षे झाली तरी आपल्या आशा आकांक्षा पूर्ण होण्याच्या दृष्टीने फारशी हालचाल होत नाही असे बहुसंख्य लोकांच्या अनुभवाला येत आहे. दारिद्र्य, बेकारी, उपासमार, विषमता, दलित कष्टकऱ्यांवरील अत्याचार सर्व काही वाढत्या प्रमाणात आहे. कशासाठी स्वराज्य मिळवले

आपण ? आता कोणत्या आशेवर जगायचे ? असा प्रश्न पडत आहे. मग आपल्या निराशेला, दुःखाला गाडून टाकण्याचे मार्ग प्रत्येकजण शोधत रहातो कोणी दारुच्या पेल्यात आपले दुःख बुडवतो तर कोणी चित्रपटांच्या कल्पनासृष्टीत विसावतो. गणेशोत्सवाचा सध्याचा हैदोस हा त्यातलाच प्रकार. देवाच्या नावा-वर दुसऱ्याकडून अंशतः सक्तीने वसूल केलेल्या पैशात काही दिवस मजेत घालवून दुःखाचा विसर पाडण्याची संधी घेतली जाते. जोरजोरात ढोल बडवून त्याच्या तालावर नाचत बेहोषी अनुभवली जाते. गणराया-बरोबर एक दिवसतरी दुःखे पाण्यात लोटली जातात. आपले कष्टकरी जीवन विसरण्यासाठी आदिवासी जमाती सामुदायिक नृत्ये करतात. त्यासारखाच पण विकृत वळण घेतलेला हा प्रकार. आदिवासींची नृत्ये ही त्यांच्या जीवनपद्धतीचा भाग असतात व ती अनिष्ट वाटत नाहीत. तर गणेशविसर्जनाच्या मिरवणुकीतील नाच हा हिडिस, बिभत्स हालचालीयुक्त असल्याने हीन वाटतो. या मिरवणूकीत गरीब, कष्टकरी लोकच अधिक प्रमाणात भाग घेतात हे लक्षात घेता वरील विचार पटू शकेल. तेव्हा अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य यासारख्या मूलभूत गरजा भागविण्याचा प्रामाणिक आणि व्यापक प्रयत्न झाल्याशिवाय अशा अनिष्ट गोष्टीपासून लोकांना परावृत्त करणे अवघड आहे. आपल्या योजनामार्फत जेव्हा खऱ्या अर्थाने जनसामान्यांच्या आकांक्षापूर्तीचा प्रयत्न केला जाईल तेव्हाच वेळ, शक्ती आणि पैसा विधायक कार्याकडे वळवणे शक्य होईल.

आर्थिक परीस्थितीबाबत जे वैफल्य लोकांना जाणवत आहे तेच राजकीय परीस्थितीबाबत जाणवत आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने पुण्यात गणपतीची ऐतिहासिक संदर्भात सचित्र माहिती देणारे प्रदर्शन भरविण्याचा प्रयत्न झुंडशाहीच्या जोरावर उधळून लावण्यात आला. विचारस्वातंत्र्य हा लोकशाहीचा गाभा आहे. पण धार्मिक भावना दुखावल्या जातात या आवरणाखाली पुरोगामी विचार मांडण्याचा हक्क डावलल्यात येतो. मतप्रदर्शनाचा हक्क बजावताना आम्हाला पोलिसांचे संरक्षण मिळत नाही. कोणत्या आधारावर म्हणावयाचे की आमच्या देशात लोकशाही आहे.

सामाजिक परिस्थितीही फारशी आशादायक नाही. दलित, आदिवासी, शेतमजूर, कामगार आदीवरील अत्याचार वाढत आहेतच, पण याला स्त्रीयाही अपवाद नाहीत. एवढेच नव्हे तर स्त्रियांकडे पहाण्याचा समाजाचा दृष्टीकोनही अधिकाधिक विकृत बनत चालला आहे. यादृष्टीने पुण्यातील गणेशोत्सवातील दोन परिसंवादाचे विषय लक्षणीय आहेत.'आजच्या तरूण पिढीला मुलींनीच बिघडवले ' आणि ' स्त्रियांना समान हक्क द्यावेत का ?' आणि या परिसंवादांना तुफान गर्दी, हशा आणि टाळ्या. यावरून स्त्रीयांकडे पहाण्याचा समाजाचा दृष्टीकोन स्पष्ट होतो. स्त्रीकडे उपभोग-वस्तू म्हणून पाहिले जाते. चित्रपट वाङमय, जाहिरात इत्यादींच्या द्वारे तिच्या शरीराचा बाजार मांडला जातोच पण त्याच्या जोडीला तिला बुद्धीमंतांकडून विनोदाचा, करमणूकीचा विषय बनविले जाते. स्त्रियांच्या प्रश्नाची गंभीरपणे दखल घेणे दूरच. उलट त्यांची टिंगलटवाळी करण्याकडे आमच्या समाजाची प्रवृत्ती. एरव्ही पुरोगामी मानले जाणारे अनेकजण स्त्रियांच्या प्रश्नाबाबत प्रतिगामी ठरतात स्त्रियाना समान हक्क द्यावेत का ? 'असा प्रश्न आज उपस्थित करणे म्हणजे इतिहासाची पावले मागे वळवण्यासरखे आहे. स्वातंत्र्य चळवळीत पुरुषांच्या बरोबरीने भाग घेऊन समान हक्कासाठी आपली पात्रता स्त्रियांनी सिद्ध केली आहे. भारतीय राज्य-घटनेने स्त्रियांना समान हक्क बहाल केले असताना त्याबद्दल प्रश्न उपस्थित करणे हे आपल्या समाजात वारे कोणत्या दिशेने वहात आहे ते दाखवते. गेल्या काही वर्षात अर्थकारणात, राजकारणात, आणि समाज-कारणात स्त्रीयांची जी पिछेहाट सुरू आहे तीसुद्धा त्याचेच गमक आहे. ' चूल आणि मूल ' करण्यासाठी स्त्रियांना चार भिंतींच्या आत डांबले जाऊ नये असे वाटत असेल तर स्त्रियांनी आणि पुरोगामी विचार-वंतानी सद्यःपरिस्थितीचा सखोल विचार केला पाहिजे. स्त्रीमुक्ती शिवाय समाजमुक्ती होणे शक्य नाही हे ध्यानात घेऊन स्त्रियांच्या प्रश्नांची दखल घेतली पाहिजे. स्त्री – संघटनांनी त्यासाठी आपले राजकीय मतभेद विसरून एकत्र आले पाहिजे. आपल्या देशात लोकशाही प्रमाणेच स्त्रीस्वातंत्र्यही धोक्यात येण्याचा संभव लक्षात घेणे जरूर आहे. तसे होऊ नये म्हणून स्त्रियांच्या चळवळीला जोरात चालना देणे आवश्यक आहे.